RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ८, अंक ११२] गुरुवार, डिसेंबर १, २०२२/अग्रहायण १०, शके १९४४ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २२७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**विधि व न्याय विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ नोव्हेंबर २०२२.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक एलओआर-२०२२/प्र.क्र.२५१/का.१४.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती व मानधन) नियम, १९८४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांस, महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती व मानधन) (सुधारणा) नियम, २०२२, असे म्हणावे.

२. महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती व मानधन) नियम, १९८४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य नियम" असा केला आहे.) याच्या नियम २ मधील,—

(एक) खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल .—

"(अ-एक) " मुख्य सादरकर्ता अधिकारी" याचा अर्थ, राज्य शासन किंवा त्याच्या अधिकाऱ्यांकरिता व त्यांच्या वतीने प्रशासकीय न्यायाधिकरण अधिनियम, १९८५ (१९८५ चा १३) अन्वये दाखल मूळ अर्ज, संकीर्ण अर्ज किंवा इतर कोणतेही अर्ज, चालविण्यासाठी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई आणि त्याची नागपूर व औरंगाबाद येथील खंडपीठे यांच्या संबंधात, या नियमांन्वये विधि व न्याय विभागामधील शासनाने त्या पदावर नियुक्त केलेला अधिवक्ता, असा आहे आणि यामध्ये सादरकर्ता अधिकाऱ्याचा समावेश होतो;" ;

(दोन) खंड (ल) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल .—

"(ल) "विधि अधिकारी" याचा अर्थ, कोणतेही न्यायालय किंवा महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण किंवा महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांच्या समोर राज्य शासनाच्या वतीने किंवा त्याच्या अधिकाऱ्यांच्या वतीने प्रकरण चालविण्यासाठी,

या नियमां अन्वये, विधि व न्याय विभागामधील शासनाने नियुक्त केलेला अधिवक्ता, असा आहे आणि यामध्ये महाअधिवक्ता, सरकारी वकील, सरकारी अभियोक्ता व मुख्य सादरकर्ता अधिकारी यांचा समावेश होतो;";

**३.** मुख्य नियमांच्या नियम ३ मधील, पोट-नियम.—

(ज) नंतर, पुढील पोट-नियम जादा दाखल करण्यात येईलः—

" (के) मुंबई, नागपूर व औरंगाबाद येथील महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणासाठी, मुख्य सादरकर्ता अधिकारी व सादरकर्ता अधिकारी ;";

**४.** मुख्य नियमांच्या नियम ४ मध्ये, पोट-नियम (ग) नंतर, पुढील नियम जादा दाखल करण्यात येईल :—

" (ह) मुंबई, नागपूर व औरंगाबाद येथील महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचा सादरकर्ता अधिकारी हा, अनुक्रमे मुंबई, नागपूर व औरंगाबाद येथील महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या मुख्य सादरकर्ता अधिकाऱ्याला दुय्यम असेल."

**५.** मुख्य नियमांच्या प्रकरण- तीन मधील, शीर्षकाऐवजी पुढील शीर्षक दाखल करण्यात येईल :—

"सरकारी वकील, सरकारी अभियोक्ते आणि मुख्य सादरकर्ता अधिकारी यांच्या शैक्षणिक अर्हता व नियुक्ती."

६. मुख्य नियमांच्या नियम ११ मधील, पोट-नियम (२) नंतर, पुढील पोट-नियम जादा दाखल करण्यात येईल :—

(३) "मुख्य सादरकर्ता अधिकारी किंवा सादरकर्ता अधिकारी म्हणून नियुक्ती करावयाची व्यक्ती,—

(अ) जी भारताची नागरिक आहे;

(ब) जिने कोणत्याही सांविधिक विद्यापीठामधून कायद्याची पदवी मिळवली आहे आणि अधिवक्ता म्हणून नाव नोंदणी केली आहे ;

(क) जी जाहिरातीच्या दिनांकाला,—

(एक) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या मुख्य सादरकर्ता अधिकाऱ्याच्या बाबतीत, अठ्ठावन्न वर्षापेक्षा अधिक वयाची नाही :

परंतु, जाहिरातीच्या दिनांकास ज्या व्यक्ती महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये मुख्य सादरकर्ता अधिकारी म्हणून काम करीत आहेत, त्या व्यक्तींच्या बाबतीत अठ्ठावन्न वर्षांची उच्च वयोमर्यादा दोन वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल.

(दोन) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणांच्या सादरकर्ता अधिकाऱ्याच्या बाबतीत, पंचावन्न वर्षापेक्षा अधिक वयाची नाही :

परंतु, जाहिरातीच्या दिनांकास ज्या व्यक्ती महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये सादरकर्ता अधिकारी म्हणून काम करीत आहेत, त्या व्यक्तींच्या बाबतीत, पंचावन्न वर्षांची उच्च वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल.

(ड) जो अधिवक्ता म्हणून वकिली व्यवसाय करीत आहे, त्यास,—

(एक) मुख्य सादरकर्ता अधिकाऱ्याच्या बाबतीत, तो सर्वसाधारणपणे दहावर्षापेक्षा कमी नाहीत इतक्या वर्षांसाठी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये वकिली व्यवसाय करीत आहे असे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या प्रबंधकाने प्रमाणित केलेले आहे; आणि

( दोन ) सादरकर्ता अधिकाऱ्याच्या बाबतीत, तो सर्वसाधारणपणे सात वर्षापेक्षा कमी नाहीत इतक्या वर्षांसाठी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये वकिली व्यवसाय करीत आहे असे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या प्रबंधकाने प्रमाणित केलेले आहे. "

**७.** मुख्य नियमांच्या नियम १४ मध्ये, पोट-नियम (१०) नंतर, पुढील पोट- नियम समाविष्ट करण्यात येईल :—

" (११) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामधील मुख्य सादरकर्ता अधिकाऱ्याची व सादरकर्ता अधिकाऱ्याची कर्तव्येः—

पूर्ववर्ती नियमांमध्ये सरकारी वकिलासाठी विहित केलेली कर्तव्ये, योग्य त्या फेरफारांसह महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या मुख्य सादरकर्ता अधिकाऱ्यास व सादरकर्ता अधिकाऱ्यास लागू असतील; आणि या कर्तव्यांबरोबरच, मुख्य सादरकर्ता अधिकारी व सादरकर्ता अधिकारी पुढील कर्तव्ये पार पाडतील :-

(अ) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणासमोर दाखल केलेल्या कामकाजामध्ये, शपथपत्रे, प्रतिशपथपत्रे, प्रत्युत्तरे अथवा लेखी कथन किंवा संकीर्ण अर्ज किंवा पुनर्विलोकन अर्ज किंवा तत्सम दस्तऐवज तयार करणे ;

(ब) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणासमोर किंवा मुंबई उच्च न्यायालयासमोर दाखल केलेल्या किंवा दाखल करावयाच्या सेवाविषयक प्रकरणांमध्ये राज्य शासनाला किंवा राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या त्याच्या अधिकाऱ्यांना सल्ला देणे;

(क) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्णयांवर, राज्य शासनाने, एकतर निर्णयांचे पालन करावे किंवा त्यास आव्हान द्यावे किंवा कसे याबाबत मत मांडणे."

८. मुख्य नियमांच्या नियम १५ मध्ये, पोट-नियम (२) नंतर, पुढील पोट-नियम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३) सरकारी वकिलांसाठी कार्यभाराच्या आणि प्रकरण व संबंधित वादप्रश्न वाटप करण्याच्या बाबतीत विहित केलेले नियम योग्य त्या फेरफारांसह, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणासाठी नियुक्त केलेल्या मुख्य सादरकर्ता अधिकाऱ्याला लागू असतील.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**निरज प्र. धोटे,**
शासनाचे प्रधान सचिव व विधि परामर्शी.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 24th November 2022.

*NOTIFICATION*

Constitution of India.

No. LOR-2021/C.R.251/D-XIV.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Law Officers (Appointment, Conditions of Service and Remuneration) Rules, 1984, namely :—

**1.** These rules may be called the Maharashtra Law Officers (Appointment, Conditions of Service and Remuneration) (Amendment) Rules, 2022.

**2.** In rule 2 of the Maharashtra Law Officers (Appointment, Conditions of Service and Remuneration) Rules, 1984 (hereinafter referred as "the Principal Rules"),—

(*i*) after clause (*a*), the following clause shall be inserted, namely :—

"(*a-i*) "Chief Presenting Officer" means an advocate appointed to that post under these rules by the Government in Law and Judiciary Department in relation to the Maharashtra Administrative Tribunal, Mumbai and its benches at Nagpur and Aurangabad, to conduct Original Application, Miscellaneous Application or any other Application filed under the Administrative Tribunals Act, 1985 (13 of 1985) for and on behalf of the State or its officers and includes Presenting Officer ; " ;

(*ii*) for clause *(l)*, the following clause shall be substituted, namely :—

"(*l*) "Law Officer" means an advocate appointed by the Government in the Law and Judiciary Department, under these rules, to conduct cases on behalf of the State or its officers before any Court or the Maharashtra Revenue Tribunal or Maharashtra Administrative Tribunal and includes an Advocate-General, a Government Pleader, Public Prosecutor and Chief Presenting Officer ; " ;

**3.** In rule 3 of the Principal Rules, after sub-rule (*j*), the following sub-rule shall be added, namely :—

"*(k)* for the Maharashtra Administrative Tribunal, the Chief Presenting Officer and the Presenting Officer for the Maharashtra Administrative Tribunal at Mumbai, Nagpur and Aurangabad.".

**4.** In rule 4 of the principal Rules, after sub-rule (*g*), the following rule shall be added, namely :—

"*(h)* the Presenting Officer for the Maharashtra Administrative Tribunal at Mumbai, Nagpur and Aurangabad shall be subordinate to the Chief Presenting Officer for the Maharashtra Administrative Tribunal at Mumbai, Nagpur and Aurangabad, respectively.".

**5.** In Chapter III of the principal Rules, for the heading, the following heading shall be substituted, namely :—

"QUALIFICATIONS AND APPOINTMENT OF THE GOVERNMENT PLEADERS, PUBLIC PROSECUTORS AND CHIEF PRESENTING OFFICERS.".

**6.** In rule 11 of the principal Rules, after sub-rule (*2*), the following sub-rule shall be added, namely :—

"*(3)* A person to be appointed as a Chief Presenting Officer or Presenting Officer shall be one,—

(*a*) who is a citizen of India;

(*b*) who has obtained a degree in Law from any statutory University and has been enrolled as an advocate ;

(*c*) who on the date of advertisement,—

(*i*) is not more than fifty eight years of age, in the case of Chief Presenting Officer for Maharashtra Administrative Tribunals :

Provided that, the upper age limit of fifty eight years shall be relaxed upto two years in case of the persons who on the date of advertisement are working as the Chief Presenting Officer in the Maharashtra Administrative Tribunals ;

(*ii*) is not more than fifty five years of age in the case of Presenting Officer for Maharashtra Administrative Tribunals :

Provided that, the upper age limit of fifty five years shall be relaxed upto five years in case of the persons who on the date of advertisement are working as the Presenting Officers in Maharashtra Administrative Tribunals.

(*d*) who has been in practice as an advocate,—

(*i*) in the case of Chief Presenting Officer, for not less than ten years, ordinarily, certified by the Registrar of the Maharashtra Administrative Tribunal that he ordinarily practices in the Maharashtra Administrative Tribunal; and

(*ii*) in the case of Presenting Officer for not less than seven years, ordinarily, certified by the Registrar of the Maharashtra Administrative Tribunal that he ordinarily practices in the Maharashtra Administrative Tribunal".

**7.** In rule 14 of the principal Rules, after sub-rule (10), the following sub-rule shall be inserted, namely :—

"(*11*) *Duties of the Chief Presenting Officer and the Presenting Officer in the Maharashtra Administrative Tribunal.*— The duties prescribed for Government Pleader in the foregoing rules shall *mutatis mutandis* apply to the Chief Presenting Officer and the Presenting Officer for the Maharashtra Administrative Tribunal; and in addition to this following duties shall be performed by the Chief Presenting Officer and the Presenting Officer, namely :—

(*a*) to prepare affidavits, counter-affidavits, replies or written statements or miscellaneous application or review applications or similar documents in the proceedings filed before the Maharashtra Administrative Tribunal;

(*b*) to give advice to the State Government or its officers representing the State Government in service matters filed or to be filed before the Maharashtra Administrative Tribunal or High Court of Bombay ;

(*c*) to render opinion on the decisions given by the Maharashtra Administrative Tribunal with reasoned views as to whether the decision should be complied with or challenged by the State Government.

**8.** In rule 15 of the principal Rules, after sub-rule (*2*), the following sub-rule shall be inserted, namely :—

"*(3)* The rules prescribed for Government Pleader in respect of charge and distribution of brief and related issues shall *mutatis mutandis* apply to the Chief Presenting Officer appointed for the Maharashtra Administrative Tribunal.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NEERAJ P. DHOTE,
Principal Secretary and R.L.A. to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.